संं.फौ.ख.क्र. २११/२०२०
निशानी क्र. १५ पुढे सुरु

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी शपथेपर सूरु :–</u>**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | **बालाजी महादेव घोडके,** |
| वय | – | ४१ वर्ष, व्यवसाय – शेती, |
| राहणार | – | तावशीताड, ता. औसा, जि. लातूर. |

**<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. एस. रेचवाडे यांचेमार्फत :–</u>**

१. मयत श्रीमंत दाणे माझ्या आत्याबहिणीचे पती होते. दि.१६–०६–२०२० रोजी दुपारी ०३.३० वाजता वांगजीपाटी येथे घटना घडली. त्यादिवशी मला बहादुर देशमुख याचा फोन आला. त्याने मला तुमच्या पाहुण्याचा अपघात झाला आहे, असे सांगितले. मी घटनास्थळी गेलो तेंव्हा बाजुला एक्सेल मोटारसायकल क्र.एमएच–२५–एक्यु–२८१५ पडलेली होती. मयत श्रीमंत बेशुध्द अवस्थेत पडलेले होते. त्यांच्या पाठीमागील बाजुस डोक्याला मार लागल्याने रक्त येत होते तसेच, कानातुन देखील रक्त येत होते. काही अंतरावर ट्रक उभा होती व त्याचा चालक पळुन गेला होता.

२. माझ्या मित्राने पाठीमागुन मयत श्रीमंत यांना ट्रकने पाठीमागून ठोकर दिल्याचे सांगितले होते. मी रुग्णवाहिका बोलावुन त्यांना लातूर येथील सरकारी दवाखान्यात पाळवून मी स्वतः मोटारसायकलवर पाठीमागे गेलो होतो. त्याठिकाणी डॉक्टरांनी तपासून त्यांना मयत घोषीत केले. त्यानंतर मी त्यांच्या पत्नीला फोन करुन लातूर येथे बोलावुन घेतलो. शव–विच्छेदन झाल्यानंतर आम्ही मृतदेह घेऊन गेलो होतो. मयत श्रीमंत यांच्या पत्नीने भादा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. ए. पटेल यांचेमार्फत :–</u>**

३. माझे इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. दत्तात्रय डोंगरे माझे मित्र असून

**सं.फौ.ख.क्र. २११/२०२०**

**निशानी क्र. १५ पुढे**

फिर्यादी नातेवाईक आहे, ईतर साक्षीदार देखील माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, औसा ते तुळजापूर याठिकाणी सतत वाहनांची ये–जा चालू असते. बहादूर सालार देशमुख हे माझे जवळचे मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी प्रत्यक्षात पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून ५० ते ६० फुट अंतरावर आशीव टोल नाका आहे. वांगजी पाटी ते टोक नाका १०० फुट अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून काही अंतरावर टोल नाका असल्याने त्याठिकाणी वाहने सावकाश जातात. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी मोटारसायकल व मयत श्रीमंत बेशुध्द अवस्थेत पडले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळापासून काही अंतरावर ट्रक थांबल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना मी प्रत्यक्षात पाहिली नसल्याने मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. घटनेनंतर ३ ते ४ दिवसांनी पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. पोलीसांनी घटनास्थळी माझा जबाब घेतला. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी औदुंबर गडीकर, डोंगरे माझ्यासोबत होते. जबाब देताना माझ्यासोबत औदुंबर गडीवर व उध्दव डोंगरे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो व पोलीसांनी माझा जबाब घेतला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला मदत करण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.08.13 16:16:46 +0530

( श्रीमती एस. डी. साबळे )

दि. १३–०८–२०२५ — २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा